**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. आ.स.जाधव — अपीलकर्ता
३९, शनिवार पेठ, एस.टी.स्टँड समोर, कराड
ता. कराड, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-१६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-१६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** — श्री. आ.स.जाधव, ३९, शनिवार पेठ, एस.टी.स्टँड समोर, कराड, ता. कराड, जि. सातारा<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा — सह संचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-१६ श्री. गो. पं. चौधरी<br>**जन माहिती अधिकारी** तथा — प्रशासकीय अधिकारी, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-१६ श्री. भि. द. मिसाळ | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आपला दहा वर्षांचा गोपनीय अहवाल सलग प्रतिकूल असल्याचे सांगण्यात आल्यामुळे या अहवालाच्या छायांकित प्रतीची मागणी आपण केली होती, परंतु ती देण्यात आली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. आ. स. जाधव यांनी केली.

श्री. जाधव यांना ज्या अधिकाऱ्यांनी गोपनीय अहवाल दि. २३.१२.२००५ रोजी दाखविले ते अधिकारी सध्या कार्यरत नाहीत, त्यामुळे कार्यालयात उपस्थित असलेली गोपनीय अहवालाची प्रतवारी विवरण पत्रानुसार श्री. जाधव यांना देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्री. भि. द. मिसाळ व अपिलीय प्राधिकारी तथा प्र. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे श्री. गो.पं. चौधरी यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. भि.द. मिसाळ, सहाय्यक संचालक, (अतांत्रिक), सेवानिवृत्त श्रीमती आरती अशोक भोसले व प्रशासकीय अधिकारी (सध्या विभागीय कार्यालय, औरंगाबाद ) श्री. व्रा. ना. देशपांडे या अधिकाऱ्यांचा याबाबतचा खुलासा पंधरा दिवसांत अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपिलीय प्राधिकारी श्री. गो.पं. चौधरी यांनी त्यानुसार संबंधितांना कळविले. तथापि अनेकदा स्मरण दिल्यानंतर दि. १५.१०.२००९ रोजी त्यांचा खुलासा प्राप्त झाला. दि. २३.१२.२००९ रोजीच्या पत्रामध्ये श्री. जाधव यांचे सलग दहा वर्षांचे गोपनीय अहवाल प्रतिकूल असल्याचे नमूद केले आहे. तथापि सलग हा शब्द अनवधानाने नमूद केला असून श्री. जाधव यांची दहा वर्षांची गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी प्रतिकूल आहे, असे नमूद करावयाचे होते, असा या खुलाशाचा सारांश आहे. विहित मुदतीत अहवाल सादर करण्याची समज श्री. भि.द.मिसाळ, श्री. डब्ल्यू. एन. देशपांडे, श्रीमती आरती अशोक भोसले व श्री. गो.पं. चौधरी यांना देण्यात येत आहे.

सन २००२ पासून आपण या अहवालाबाबतची माहिती मागत असून ती गोपनीय म्हणून दिली जात नव्हती. तथापि आयोगाच्या आदेशानुसार आपल्याला माहिती मिळाली व त्यामुळे सन १९९५ पासून (बॅक डेटेड) पदोन्नती मिळाली व फरकापोटी अंदाजे तीन लाख व पेन्शनमध्ये दरमहा रू. २०००/- ची वाढ मिळाली, असे श्री. जाधव यांनी दि. १८.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.गजानन बाबुराव क्षीरसागर
कृष्णामाई शिक्षण प्रसारक मंडळ, धामणेर
३२१/१ब, राधिकानगर, प्लॉट नं.७, अद्वैत,
घर नं.५६, पो.खिंडवाडी ता.जि.सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, ता.कोरेगाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५६/ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** -

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा श्री.उदयसिंह भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय,
ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.बाळकृष्ण बाबुराव जगताप

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.०१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०२.०३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |

| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.बाळकृष्ण बाबुराव जगताप यांनी आपला अर्ज न स्वीकारता परत पाठविला. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा श्री.उदयसिंह भोसले यांनी अपिलाची दखल घेतली नाही व कर्मवीर भाऊराव पाटील, धामणेर मधील बोगस विद्यार्थी व विद्यार्थिनींची माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गजानन बाबुराव क्षीरसागर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात व लेखी निवेदनात केली आहे. मुख्याध्यापक व काही संस्थासदस्य, शिक्षणाधिकारी; जिल्हा परिषद,सातारा, शिक्षण उपसंचालक; कोल्हापूर विभाग आदी सर्व जण गैरप्रकारात गुंतले असल्याचा आरोप श्री.क्षीरसागर यांनी निवेदनात केला आहे. तसेच 'माहिती मागविणारी व्यक्ती आपण नोकरी करीत असलेल्या संस्थेचे संस्थापक आहेत.' अशा स्वरुपाचे उल्लेखही अर्जात केले आहेत.

कर्मवीर भाऊराव पाटील, धामणेर व तिची भागशाळा कठापूर ही दोन्ही गावे ग्रामीण भागातील असून तेथे शिकणारी मुले शेतकऱ्यांची, शेतमजुरांची व फिरस्त्या कुटुंबाची आहेत. श्री.क्षीरसागर हे संस्थेच्या व प्रशालेच्या कारभारासंदर्भात गावातील राजकीय गटातटातून तक्रारी करीत आले आहेत. तसेच जिल्हाधिकाऱ्यांसह विविध पातळयांवर आपण कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.बाळकृष्ण बाबुराव जगताप यांनी केले.

संबंधित शिक्षण संस्थेविरुध्दच्या तक्रारींबाबत चौकशी करण्यात आली होती. तसेच शाळेला 'कारणे दाखवा' नोटीस देण्यात आलेली आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा श्री.उदयसिंह भोसले यांनी केले. प्रथम

अपिलाची सुनावणी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व आयोगाकडील सुनावणी या तीनही वेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

शाळेच्या पटाविषयीच्या दिलेल्या तक्रारींबाबत केलेल्या चौकशींचा अहवाल व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सातारा, जि. सातारा श्री.उदयसिंह भोसले यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा श्री.उदयसिंह भोसले यांनी दि.२७.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केलेला वस्तुस्थिती स्पष्ट करणारा अहवाल स्वीकारण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ११ /१२/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

सौ. सरस्वती महादेव जाधव
मु.पो.गारगोटी, खानापूर, ता.भुदरगड,
जि. किोल्हापूर

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी **तथा** गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुदरगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५९ / कोल्हापूर |
| २ | **सुनावणीची तारीख** | दि. ३०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — सौ. सरस्वती महादेव जाधव, मु.पो.गारगोटी, खानापूर, ता.भुदरगड, जि. किोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम. बी. चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा — गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुदरगड, जि. कोल्हापूर श्री. एच.डी. नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९९७ ते २००७ या काळातील गारगोटी ग्रामपंचायतीच्या अधिपत्याखालील दुकान गाळ्याच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती विहित मुदतीत दिली नाही, तसेच दिलेली माहिती अपुरी व अयोग्य आहे. ग्रामपंचायतीचे गाळे लिलावात कमी किंमतीने दिले आहेत. गाळ्यांमध्ये वीज नाही. विजेचा पुरवठा करावा व भाडे आकारणी योग्य पध्दतीने व्हावी, अशी मागणी अपीलकर्त्या सौ. सरस्वती महादेव जाधव यांनी केली.

सौ. जाधव यांनी मूळ अर्ज उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे केला होता. माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे व ग्रामसेवक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला. कळविलेले शुल्क सौ. जाधव यांनी भरले नाही. तीन पत्रे पाठवूनही माहिती नेली नाही. व्यक्तिशः देऊ केली असता ती स्वीकारली नाही, त्यामुळे रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. विशिष्ट नमुन्यात माहिती मिळावी, अशी त्यांची मागणी होती. तीही जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तथापि सौ. जाधव यांना दिलेल्या गाळ्याचा कर त्यांनी भरला नसून त्या अनुषंगाने असलेली मागणी पूर्ण होण्यासाठी त्या विविध पातळ्यांवर अर्ज व अपिले करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुदरगड, जि. कोल्हापूर श्री. एच.डी. नाईक यांनी केले.

सौ. जाधव यांनी प्रथम अपील केलेले नाही. वेगवेगळ्या कार्यालयांकडे त्यांनी अर्ज केले असून त्यांची मागणी प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीची आहे. दिलेली माहिती तपासण्यासाठी गट विकास अधिकाऱ्यांकडे पाठविण्यासारखा पत्रव्यवहार त्या करतात व तसे प्रमाणपत्र मागतात, तेही देण्यात आले. असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम. व्ही. चौगुले यांनी केले.

सौ. जाधव यांनी केलेल्या अर्जांचा तपशील, तसेच दिलेल्या माहितीबाबत शहानिशा करून उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार आपल्याला माहिती मिळाली नाही, अशी तक्रार सौ. जाधव यांनी विविध पत्रांन्वये सातत्याने आयोगाकडे केली. तथापि सौ. जाधव यांना संपूर्ण माहिती देण्यात आली असून दि. १५ मार्च २००७ ते दि. १९ सप्टेंबर २००९ या कालावधीत ४३ अर्ज व पत्रव्यवहार सौ. जाधव यांनी केल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम. बी. चौगुले यांनी, दिलेल्या माहितीच्या प्रतीसह दि. ३.१.२००९ रोजी व दि. २६.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केली आहे,असे स्पष्ट होते. सबब, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत.चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी बबन खेडेकर — अपीलकर्ता
रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे
द्वारा श्री. स्वप्नील कृषी सेवा केंद्र,
एस.टी.स्टँड समोर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी, केडगाव विभाग केडगाव, ता.दौंड, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी, शिक्रापूर. ता. शिरूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.११.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. शिवाजी बबन खेडेकर<br>रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे<br>द्वारा श्री. स्वप्नील कृषी सेवा केंद्र,<br>एस.टी.स्टँड समोर |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

शेतकरी वीज ग्राहकांबाबतची माहिती मागणारा आपला अर्ज जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, शिक्रापूर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्याकडे वर्ग केला, परंतु

त्यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही, म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, केडगाव यांच्याकडे अपील केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी, शिक्रापूर उपविभाग, यांनी कळविलेले शुल्क भरल्यानंतरही आपल्याला कोणतीही माहिती देण्यात आली नाही, म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर शास्तीसह कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. शिवाजी बबन खेडेकर यांनी केली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी हे आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स, तसेच सुनावणीसही उपस्थित नव्हते.

अपीलकर्त्यास शुल्क भरून घेऊनही माहिती न देणे, आयोगाच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स व सुनावणीस उपस्थित न राहणे ही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची कृती योग्य नाही. त्याची गंभीर दखल घेण्यात येत आहे.

अधीक्षक अभियंता, बारामती ग्रामीण मंडळ, बारामती, जि. पुणे यांनी याबाबत चौकशी करून संबंधितांच्या खुलाशासह आयोगाला अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अधीक्षक अभियंता, बारामती ग्रामीण विद्युत मंडळ, बारामती, जि. पुणे यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या कालावधीतील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा खुलासा घेऊन त्यासह अहवाल दि. २०.१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा. त्यानंतर संबंधितांवरील शास्ती व अन्य कारवाईबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

पुणे
दि. ३०.१२.२००९

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

ॲड. राजीव आ. लाले
२९२, लाले बंगाली, महावीर नगर,
सांगली ४१६ ४१६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,
कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,
कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.०४.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** ॲड. राजीव आ. लाले<br>२९२, लाले बंगाली, महावीर नगर, सांगली ४१६ ४१६ | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.०७.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण माहिती मागण्यासाठी रजिस्टर टपालाने पाठविलेला अर्ज संस्थेने स्वीकारला नाही व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली यांनी अपिलाची दखल घेतली नाही. कोणतीही माहिती देण्यात आली नसल्यामुळे जन माहिती

अधिकारी तथा सचीव,गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता ॲड.राजीव आ. लाले यांनी केली. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व आयोगपुढील सुनावणी या दोन्हीला जन माहिती अधिकारी तथा सचीव,गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली उपस्थित नव्हते. त्याबाबत, तसेच अपीलकर्त्याचा अर्ज न स्वीकारण्याबाबत आयोगाने त्यांचा खुलासा मागविला.

ॲड.लाले यांनी पाठविलेला अर्ज संस्थेच्या अध्यक्षांच्या नावे होता. ते उपस्थित नसल्यामुळे पत्र परत गेले. आयोगाकडून दि.७.११.२००७ रोजी आलेल्या पत्रानंतर संस्थेच्या सचिवाकडे रीतसर अर्ज करण्यास ॲड.लाले यांना कळविले. परंतु त्यांनी अर्ज केला नाही. आयोगाकडील सुनावणीचे सूचनापत्र न मिळाल्यामुळे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' व सुनावणीला उपस्थित राहता आले नाही. ॲड. लाले यांना हवी असणारी माहिती देण्यास संस्था तयार आहे, असा खुलासा संस्थेचे अध्यक्ष, गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली श्री.संपत पाटील यांनी दि.२७.०५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्ता ॲड.राजीव आ. लाले यांनी माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी तथा सचीव,गांधी शिक्षण प्रसारक मंडळ,कणेगाव, ता.वाळवा, जि.सांगली यांच्याकडे द्यावी. ॲड. लाले यांनी मागितलेली माहिती संस्थेच्या स्थापनेपासूनची, नेमकेपणाऐवजी सरसकट, विस्तृत स्वरुपाची आहे, हे लक्षात घेता माहिती आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन योग्य ते शुल्क भरुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती घ्याव्यात.

**पुणे**
**दिनांक : ११ /१२/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

प्रा. बाबु गणपत यादव
मु.पो. खातगुण, ता.खटाव, जि. सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**१. अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) , कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

उत्तरवादी

**२. अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, मुंबई

**१. जन माहिती अधिकारी** तथा सचीव, रयत शिक्षण संस्था, सातारा

**२. जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, आबासाहेब मराठे कॉलेज, राजापूर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

**३. जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) किर्लोस्करवाडी, ता. पलूस, जि. सांगली-४१६ ३०८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६६+३६७+३६८+३६९+३७०+३७३+३७५+ ३७६+३७७+३७८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — प्रा. बाबु गणपत यादव
मु.पो. खातगुण, ता.खटाव, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) , कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर डॉ. बाबासाहेब कदम

**जन माहिती अधिकारी** तथा — सचीव, रयत शिक्षण संस्था, सातारा
श्री. जे. जी. जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा — प्राचार्य, आबासाहेब मराठे कॉलेज, राजापूर,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी
डॉ. वसंत श्रीराम गनबावले

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा | प्राचार्य, आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज,<br>रामानंदनगर (बुर्ली) किर्लोस्करवाडी, ता. पलूस,<br>जि. सांगली-४१६ ३०८<br>श्री. सुरेश तुकाराम सांळुखे |

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ३६६ / सातारा | १२.१२.२००७ | -- | २९.१.२००८ | -- |
| ३६७ / सातारा | १२.१२.२००७ | -- | २९.१.२००८ | -- |
| ३६८ / सातारा | १७.१२.२००७ | १७.३.२००८ | २३.२.२००८ | -- |
| ३६९ / सातारा | १७.१२.२००७ | -- | २३.२.२००८ | -- |
| ३७० / सातारा | १२.१२.२००७ | -- | ३०.१.२००८ | १८.२.२००८ |
| ३७३ / सातारा | १२.१२.२००७ | -- | ३०.१.२००८ | १८.२.२००८ |
| ३७५ / सातारा | १२.१२.२००७ | -- | ७.२.२००८ | -- |
| ३७६ / सातारा | १२.१२.२००७ | -- | २९.१.२००८ | १८.२.२००८ |
| ३७७ / सातारा | १७.१२.२००७ | -- | ४.२.२००८ | -- |
| ३७८ / सातारा | १७.१२.२००७ | -- | ३१.१.२००८ | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जांच्या (जोडपत्र-अ) छायाप्रती सोबत जोडल्या आहेत. |

## विवेचन

रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयांमध्ये सन १९९४ पासून आपण काम केले. सन २००७ पासून आपल्याला हजर करून घेतले नाही. त्या अनुषंगाने निवड समितीचे अहवाल, विशिष्ट कालावधीचा पगार न मिळण्याची कारणे आदीबाबतची माहिती संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरून मिळाली नाही, या कारणावरून अपीलकर्ता प्रा. बाबु गणपत यादव यांनी राज्य माहिती आयोगाकडे दहा अपिले केली आहेत.

आपल्याला काही माहिती मिळाली आहे, परंतु ती अपुरी असून ऊर्वरित माहिती दिली गेली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता प्रा. यादव यांनी केले.

त्या वेळच्या व्यवस्थेप्रमाणे विभागात सह संचालक, उच्च शिक्षण हे अपिलीय प्राधिकारी नव्हते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी शिक्षण संस्थेचेच होते. त्यामुळे मूळ अर्ज व त्या संदर्भातील अपिले प्रा. यादव यांनी रयत शिक्षण संस्थेकडेच करणे आवश्यक होते. म्हणून तसे प्रा. यादव व रयत शिक्षण संस्था यांना कळविण्यात आले होते, असे विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर डॉ. बाबासाहेब कदम यांनी लेखी व तोंडी नमूद केले. प्रा. यादव यांना वेळोवेळी त्यांच्या अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. त्यांची माहितीची मागणी सातत्याने व विविध स्वरूपाची असल्यामुळे काही माहिती द्यावयाची राहिली आहे, असे त्यांचे म्हणणे असल्यास ती देण्यात येईल. तथापि काही अर्जांमध्ये प्रा. यादव यांनी अभिप्राय, स्पष्टीकरण यांची मागणी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी मागणी करता येत नाही, त्यामुळे ती दिलेली नाही, असे प्रतिपादन संबंधित सर्व जन माहिती अधिकाऱ्यांनी लेखी / तोंडी केले.

अपील क्र. ३६३, ३६६, ३६७, ३६८, ३६९, ३७०, ३७६ यामध्ये माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे अपीलकर्ता प्रा. बाबु गणपत यादव, संबंधित जन माहिती अधिकारी श्री. जे. जी. जाधव व अपिलीय प्राधिकारी डॉ. बाबासाहेब कदम यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात लेखी नमूद केले आहे.

अपील क्र. ३७५ मध्ये संबंधित अर्ज प्राप्त झाला नसल्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न आला नाही. मूळ अर्ज प्रा. यादव यांनी दिल्यास आठ दिवसांत माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, आबासाहेब मराठे कॉलेज, राजापूर, जि. रत्नागिरी डॉ. वसंत श्रीराम गनबावले यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात लेखी नमूद केले आहे. त्यानुसार दि. २३.८.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिल्याचे संबंधित प्रतीच्या माहितीसह त्यांनी आयोगाला अवगत केले.

अपील क्र. ३७७ व ३७८ यांमध्ये मूळ अर्ज प्रा. यादव यांनी दिल्यास पंधरा दिवसांत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कबूल केले. त्यानुसार दि. २७.८.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिल्याचे संबंधित माहितीच्या प्रतींसह आयोगाला अवगत केले. माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे अपीलकर्ता प्रा. बाबु गणपत यादव, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर, किर्लोस्करवाडी, ता. पलूस श्री. सुरेश तुकाराम साळुंखे व

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर डॉ. बाबासाहेब कदम यांनी लेखी नमूद केले.

वेळोवेळी भेटूनही आपल्याला ऊर्वरित माहिती अद्याप दिली नाही, अशी तक्रार प्रा.यादव यांनी दि. २३.१.२००९ च्या पत्रानवये आयोगाकडे केली. याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा सचिव, रयत शिक्षण संस्था यांनी आयोगाने दि. ८.१०.२००९ च्या पत्रान्वये विचारणा करुनही अद्याप सादर केलेली नाही, ही बाब गंभीर असून जन माहिती अधिकारी तथा सचिव यांना समज देण्यात येत आहे. सचीव, रयत शिक्षण संस्था यांना विलंबाबाबत त्वरित खुलासा करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. ऊर्वरित माहिती न मिळाल्याच्या अपीलकर्ता प्रा. बाबु गणपत यादव यांच्या तक्रारीबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.१२.२००९ पर्यंत पूरक कागदपत्रांसह लेखी खुलासा आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. १७.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सखाराम गणपती शिंदे
सर्व्हे कॉलनी, प्लॉट नं.१८, ए वॉर्ड, राधानगरी रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
२०४/ख/ई, शाहूपुरी, भू-विकास बँक इमारत, तिसरा मजला,
हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
बाहुबली जिल्हा नागरी पतसंस्था, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सखाराम गणपती शिंदे
सर्व्हे कॉलनी, प्लॉट नं.१८, ए वॉर्ड, राधानगरी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, २०४/ख/ई, शाहूपुरी, भू-विकास बँक इमारत, तिसरा मजला, हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दिलेली माहिती चुकीची व अपुरी असून अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही माहिती देण्यात आली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सखाराम गणपती शिंदे यांनी केले.

अपीलकर्ता श्री.सखाराम गणपती शिंदे हे कर्जदार असून कर्जप्रकरणाची संपूर्ण माहिती त्यांना दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, बाहुबली जिल्हा नागरी पतसंस्था, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.संजय देवाप्पा चौगुले यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. श्री.शिंदे यांनी कर्जफेड केल्याशिवाय त्यांना माहिती देण्यात येणार नाही, असेही श्री.शिंदे यांना कळविल्याचे त्यांनी म्हटले आहे.

श्री.शिंदे यांच्या तक्रारी मुख्यत: प्रशासकीय कार्यवाहीविषयाच्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नागरी सहकारी पतसंस्थांना लागू नसतानाही माहिती दिली आहे, असे पतसंस्थेचे सरव्यवस्थापक श्री.शांतीनाथ बापू चौगुले यांनी नमूद केले असून श्री.शिंदे व पतसंस्था यांच्यातील न्यायालयीन वादाविषयीचा तपशील लेखी निवेदनात नमूद केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ पतसंस्थांना लागू नसल्याचे त्यांचे निवेदन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.



**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नौशाद महंमद इसाक शेख
७१६, नयू पाच्छा पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा हिंदुस्थान मागासवर्गीय अल्पसंख्याक शिक्षण संस्था, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
समाधान प्राथमिक मराठी विद्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
समाधान प्राथमिक मराठी विद्यालय, सोलापूर सौ.ए.एम.करजगी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती मुख्याध्यापिका यांनी द्यावी, अशा सूचना जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी मुख्याध्यापिका, समाधान प्राथमिक मराठी विद्यालय, सोलापूर यांना देऊनही मुख्याध्यापिका यांनी माहिती दिली नाही. संस्थेचे सचिव अपिलीय प्राधिकारी असल्यामुळे टपालाचा दाखला घेऊन त्यांच्याकडे केलेले अपील त्यांनी न स्वीकारता परत पाठविले व कोणतीही माहिती आपल्याला मिळाली नाही. त्यामुळे संस्थेच्या मुख्याध्यापिका व सचिव यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.नौशाद महंमद इसाक शेख यांनी केली.

अपीलकर्ता श्री.शेख यांचा मूळ अर्ज मुख्याध्यापिकांना प्राप्त झाला नाही. तसेच अपीलही प्राप्त झालेले नाही. टपालाचा दाखला घेऊन पाठविलेले पत्र न स्वीकारल्यास पाठविणाऱ्यास परत केले जात नाही. मात्र हे पत्र परत मिळाल्याचे दाखवून बनावट कागदपत्राच्या आधारे श्री.शेख तक्रार करीत आहेत. त्यामुळे त्यांच्यावरच कारवाई करावी, असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, समाधान प्राथमिक मराठी विद्यालय, सोलापूर सौ.ए.एम.करजगी यांनी केले.

अपीलकर्ता यांनी मूळ अर्जाची प्रत मुख्याध्यापिका यांना सादर करावी व त्यानुसार मुख्याध्यापिकेने त्यांना माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.शेख यांनी मुख्याध्यापिका यांना अर्ज दिला व मुख्याध्यापिका यांनी माहिती दिली. तथापि आपल्याला दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याची तक्रार श्री.शेख यांनी दि.४.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र अपीलकर्त्याची मूळ मागणी संस्थेतील नियुक्तीची असून ती प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

अंतर्गत ती येत नाही. त्याबाबतचे प्रस्ताव आदींची सर्व माहिती देण्यात आली असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी शामराव पाटील
शिवाजी पुतळा चौक, पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी शामराव पाटील
शिवाजी पुतळा चौक, पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.वि.हं.चिकाळकर

**जना माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.वि.हं.चिकाळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. --- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीची घटना, नियमावली आदि माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शिवाजी शामराव पाटील यांनी केली.

घटना व नियमावली नसल्यामुळे देता आली नाही. तसेच दोन कार्यालयाच्या अधीक्षक पदाचा कार्यभार, रोज सुमारे २०० ते ३०० पक्षकारांना भेटून नकलांच्या सह्या आदि कारवाई करणे, आदि बाबीमुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही. घटना व नियमावली तयार नसल्याचे पत्र अपीलकर्त्यास देत आहे. अन्य माहिती ते कार्यालयात उपस्थित राहतील तेव्हा त्वरित देण्याची व्यवस्था करीत आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.वि.हं.चिकाळकर यांनी केले. आपल्याला ते मान्य असल्याचे अपीलकर्ता श्री.शिवाजी शामराव पाटील यांनी सांगितले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव रामचंद्र माने
१४/६४, काडपुरे तळ, इचलकरंजी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा यंत्रमाग पर्यवेक्षक, मध्यवर्ती संघ,
एस.टी.स्टँड जवळ, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्रीमती नि. व्ही.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा यंत्रमाग पर्यवेक्षक, मध्यवर्ती संघ,
एस.टी.स्टँड जवळ, इचलकरंजी, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.५.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.६.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीलाही गैरहजर होते.

यंत्रमागाच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती देण्यात, अर्ज अन्य कार्यालयाकडे वर्ग करून टाळाटाळ व हलगर्जीपणा केला, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.महादेव रामचंद्र माने यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील अर्जात केली आहे.

श्री.माने यांनी मागितलेली माहिती यंत्रमाग संस्थेच्या बाबत होती. त्यामुळे अर्ज यंत्रमाग पर्यवेक्षक, इचलकरंजी यांच्याकडे हस्तांतरीत केला. तथापि, आपल्या कार्यालयाकडे जन माहिती अधिकारी, असे पद नाही व अर्जाची नक्कल प्राप्त नाही, म्हणून यंत्रमागदेशक, वस्त्रोद्योग कॅम्प कार्यालय, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांनी तो पुन्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडे पाठविला. माहिती न मिळाल्याने श्री.माने यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. वस्तुतः संबंधित माहिती प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, सोलापूर यांच्याकडे मिळू शकेल आणि इचलकरंजी यंत्रमागदेशक यांचे कार्यालय हे वस्त्रोद्योग विभागाचे कॅम्प कार्यालय आहे. म्हणून संबंधित माहिती प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. ४०० पेक्षा जास्त यंत्रमाग संस्थांची माहिती अपीलकर्ता यांनी मागितली होती. ती अभिलेखावरून संकलित करून यंत्रमागदेशक यांनी दि.१.७.२००८ रोजी अपीलकर्त्यास पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा यंत्रमागदेशक, वस्त्रोद्योग कॅम्प कार्यालय, इचलकरंजी, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे व अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्रीमती नि.व्ही.गायकवाड

यांनी पूरक कागदपत्रांसह केले. संबंधित निवेदने व कागदपत्रांचे अवलोकन करता माहिती नेमक्या कोणत्या कार्यालयाकडे आहे हे स्पष्ट नसल्यामुळे विलंब झाला,असे दिसते. तथापि उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्रीमती नि.व्ही.गायकवाड यांनी याबाबत अधिक दक्षता घेणे आवश्यक होते, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.११.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

ॲड. श्रीपाद दत्तात्रय आष्टेकर — अपीलकर्ता
४६/५, जानकी निवास, मंगळवार पेठ,
जत, ता. जत, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक (वाचक), कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.४.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — ॲड. श्रीपाद दत्तात्रय आष्टेकर
४६/५, जानकी निवास, मंगळवार पेठ,
जत, ता. जत, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा — विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा — पोलीस उपअधीक्षक (वाचक), कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. श्रीपाद दत्तात्रय आष्टेकर यांनी मागितलेली माहिती न्याय प्रविष्ट प्रकरणांशी व गोपनीय या शीर्षाखाली प्राप्त झाली असल्यामुळे नाकारण्यात आली. विहित मुदतीत त्याबाबत त्यांना कळविले होते. त्याच कारणास्तव त्यांचे अपील नाकारण्यात आले. तथापि राज्य माहिती आयोगाकडून मिळालेल्या मार्गदर्शनानुसार ॲड. आष्टेकर यांना चौकशी अहवालाच्या सत्य प्रती निःशुल्क देण्यात आल्या, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (वाचक), कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री. पी. ए. पाटील यांनी नमूद केले. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री. हं. शा. महाडीक यांनी या याबाबतचा तपशील लेखी निवेदनात सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. ११.१२.२००९**